# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

CIN : U40109MH2005SGC153646

**अधिक्षक अभियंता (स्थापत्य),**

अउदा स्थापत्य बांधकाम नि. सुव्यवस्था मंडल, ऐरोली,

ब्रम्हपुत्रा बिल्डिंग, पहिला मजला, ठाणे–बेलापुर मार्ग

म.रा.वि.पा.कं.मर्या.संकुल. ऐरोली नवी मुंबई–४०० ७०८

☎ ०२२–२७६०१६२२(का)

E-mail- se7700@mahatransco.inwebsite:- www.mahatransco.in

संदर्भ क्र. अअस्था/अउदा स्था.बां.नि.सु.मं./ऐरोली/तात्रिक/ D-1184 दिनांक : 10 OCT 2022

विषय :– सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता अंतर्गत वर्ग ५ यांना नोंदणी प्रमाणपत्राचे व लॉटरी पध्दतीने कामे वाटप करण्यासंबधी प्रथम लॉटरी (२०२२–२०२३) बैठक दि. २०.१०.२०२२ (गुरुवार) ला घेणेबाबत.

संदर्भ :– १. I, E&L Dept. GoM GR No. Misc.-2015/CR-63/Energy-5 Dtd. 26.03.2015.
२. MSETCL/CO/Tr.O&M/SE-II/EE-VIII/12883 dtd. 05.12.2016.
३. C.O. Letter vide No. 1046 dtd. 25.01.2018.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्थापत्य) यांना विनास्पर्धा थेट लॉटरी पध्दतीने कामे वाटपाची योजना महाराष्ट्र शासनाच्या निर्णय संदर्भ क्रं. (१) अन्वये अधीन राहून महापारेषण कंपनीने संदर्भ क्रं. (२) अन्वये लागू केली आहे.

सदरील नोटीस ही दि. १०.१०.२०२२ रोजी प्रसिध्दीस देण्यात येत असून प्रसिध्दीच्या दिनांकापासून २०.१०.२०२२ पर्यंत महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, ऐरोली या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दीस्तव उपलब्ध असेल.

या योजने अंतर्गत अधिक्षक अभियंता (स्था), अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, ऐरोली या कार्यालयात दि. २०.१०.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता खालील कामांसाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम लॉटरी (२०२२–२०२३) बैठक आयोजित करण्यात येत आहे.

| अ. क्रं. | कामाचे नाव | रक्कम ( सर्व करासहित ) | जिल्हा |
|---|---|---|---|
| १. | Reconstruction of collapsed compound wall and concrete road with drain at 100 KV Khopoli Substation, Dist. Raigad. | Rs. 14,95,069.00 | रायगड |
| २. | Renovation of various toilet block and providing washroom facility for watchman cabin, conference hall at Takka Panvel Premises. | Rs. 13,97,577.00 | रायगड |

<u>अटी व शर्ती:–</u>

१) सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांनी लॉटरीसाठी उपस्थित राहताना खालील तपशील सोबत आणणे बंधनकारक आहे.

अ. महाराष्ट्र शासनाची स्थापत्य कामासाठीची वैध अनुज्ञाप्ती.

ब. सर्व शासकीय /निम–शासकीय / खाजगी आस्थापनेमध्ये एकूण केलेल्या व चालू असलेल्या कामाचा तपशील.

क. रहिवासी प्रमाणपत्र व सर्व मूळ कागदपत्रे.

२) संबंधित अधिक्षक अभियंता यांच्या कार्यक्षेत्रात रहिवासी असलेल्या बेरोजगार अभियंत्याला लॉटरीमध्ये सहभाग घेता येईल. कार्यक्षेत्राबाहेरील बेरोजगार अभियंता लॉटरीमध्ये सहभाग घेऊ शकणार नाही.

३) ही सवलत अभियांत्रिकी पदवी / पदविका उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या आत नोंदणी केलेल्या सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्यांना (विद्युत व स्थापत्य) लागू होईल. लॉटरी पध्दतीने कामे वाटपाच्या वेळेस सदर स्थापत्य अभियंता हा सुशिक्षित बेरोजगार असावा तसेच तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा. उपस्थित असलेल्या सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास त्याला महापारेषण कंपनीने प्रदान केलेला नोंदणीकृत परवाना रद्द करण्यात येईल, तसेच महापारेषण कंपनीने या योजनेंतर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सदर लॉटरी बैठक दि. २०.१०.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता अउदा स्थापत्य बांधकाम नि. सुव्यवस्था मंडल, ऐरोली, ब्रम्हपुत्रा बिल्डिंग, पहिला मजला, ठाणे–बेलापुर मार्ग म.रा.वि.पा.कं.मर्या.संकुल. ऐरोली या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. वरील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणा–या वैध सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांना आव्हान करण्यात येते की, त्यांनी नियोजित वेळेस कागदपत्राच्या सत्य प्रत सोबत या कार्यालयात उपस्थित राहावे.

(मोहन ननावरे)
अधिक्षक अभियंता (स्था.)(प्रभारी)
अउदा स्था.बां. नि सु. मंडल, ऐरोली

प्रत सादरः–

१. कार्यकारी अभियंता (स्था), अउदा स्था.बां. नि सु. विभाग, पनवेल.
वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यासोबत नियोजित वेळेत या कार्यालयात उपस्थित राहावे.
२. व्यवस्थापक (विवले) अउदा स्था.बां. नि सु. मंडल, ऐरोली
३. अति. कार्यकारी अभियंता (स्था), अउदा स्था.बां. नि सु. उपविभाग –पनवेल, उपविभाग – खारघर.
वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यासोबत नियोजित वेळेत या कार्यालयात उपस्थित राहावे.
४. नोटीस बोर्ड.